http://www.sgbauonline.com/



# B.Com. Part–I (Semester–I) Examination

## (Optional Languages)

## MARATHI (Compulsory)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**नोट :— सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक.

1. 'भारतीय लोकशाही चे भवितव्य काय ?' या लेखात डॉ. आंबेडकरांनी कोणते विचार मांडले आहेत ? 10

**किंवा**

नवीन ग्रंथांची आवश्यकता आणि वाचन संस्कृतीचे मोल या संबंधीचे लोकहितवादी यांचे विचार तुमच्या शब्दात लिहा.

2. शेतीची सुधारणा करण्याविषयीचे काणते उपाय महात्मा फुले यांनी सुचविलेले आहेत ? 6

**किंवा**

डॉ. कुसुमावती देशपांडे यांचे 'भाषा आणि लोकजीवन' या पाठातील विचार तुमच्या शब्दात लिहा.

3. जीवनातून जन्माला येणाऱ्या कवितेची हृदयद्रावक प्रक्रिया बाबूराव बागूलयांनी कशी उलगडून दाखविली आहे, ते लिहा. 10

**किंवा**

हमीद दलवाई यांच्या 'लाट' या कथेचा आशय तुमच्या शब्दात लिहा.

4. 'युवाकोण ?' या पाठाच्या आधारे बाबा आमटे यांच्या युवकांविषयीच्या विचारांचा आढावा घ्या. 6

**किंवा**

'सांजवात' या पाठाच्या आधारे राजे सयाजीराव गायकवाड यांच्या स्त्री शिक्षण विषयक कार्याचा आढावा घ्या.

5. नारायण सुर्वे यांच्या 'शीगवाला' या कवितेचा आशय तुमच्या शब्दात लिहा. 10

**किंवा**

'ओले मूळ भेदी खडकाचे अंग' या संत तुकारामांच्या अभंगाचा आशय तुमच्या शब्दात लिहा.

6. कवी तुळशीराम काजे यांच्या 'निरभ्र' या कवितेतून जगण्याची महत्ता कशी व्यक्त झाली आहे ते लिहा. 6

**किंवा**

श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी 'वटहुकूम' या कवितेत कोणते वास्तव मांडले आहे ?

7. नभोवाणी आणि दूरचित्रवाणी साठी लेखनकसे करावे ते स्पष्ट करा. 10

**किंवा**

वृत्तपत्रा चे स्वरूप स्पष्ट करून बातमी कशी लिहावी ते सांगा.

8. खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

क्रेडिट कार्डांची सुरूवात 1946 साली झाली. न्यूयॉर्कच्या 'फ्लॅशबुश नॅशनल बॅंक ऑफ ब्रूकलिन' नावाच्या बॅंकेत जॉन बिगिन्स नावाचा माणूस बॅंकेच्या कर्जवाटप विभागात कामाला होता. त्यानं त्या बॅंकेच्या खातेदारां



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

साठी 'चार्ज इट' नावाची पद्धत सुरू केली. त्यानुसार बँकेचे खातेदार बँकेत रोख रक्कम भरून त्या रकमेच्या मोबदल्यात ठरवीक प्रकारची कूपन्स होऊ शकत. नंतर दुकानांमध्ये खरेदी केल्यावर बिलाचे पैसे त्या कूपन्सद्वारे चुकवता येत. दुकानदार ही कूपन्स पुन्हा बँकेत भरू शकत आणि संबंधित बँक दुकान दारांना कूपन्सच्या मोबदल्यात रोख रक्कम देई. अर्थातच ही पद्धत अगदी बाळबोध होती. 1951 साली न्यूयॉर्कच्याच 'फ्रँकलिन नॅशनल बँक' नावाच्या बँकेनं प्रथमच आपल्या खातेदारांना क्रेडिट कार्ड पाठवून दिलं. तसंच अनेक दुकानदारांना गाठून त्यांनी पैशांऐवजी या क्रेडिट कार्डद्वारे ग्राहकांनी बिलं भरली तरी ती स्वीकारावीत यासाठीचे करार केले. या पद्धतीचा कुणी गैरवापर करू नये यासाठी एखादा दुकानदार क्रेडिट कार्डानं जास्तीत जास्त किती रकमेची बिलं स्वीकारू शकतो यावर मर्यादा घातलेल्या असायच्या.

1950–60 च्या दशकांमध्ये फ्रँकलिन नॅशनल बँकेची री ओढत अनेक अमेरिकी बँकांनी आपापली क्रेडिट कार्ड्स् बाजारात आणली; पण त्यात अनेक अडचणी येऊ लागल्या. उदाहरणार्थ, एका बँकेनं दिलेलं क्रेडिट कार्ड ठरावीक दुकानां मध्येच चालायचं. इतर कुठल्या दुकानांमध्ये खरेदी करायची झाली, की तयामुळे ग्राहकाची पंचाईत होई. तसंच बँकाही स्थानिक पातळीवरच्या असल्यामुळे एखादी माणूस परगावी गेला आणि तिथे त्याला आपलं क्रेडिट कार्ड वापराचयं असेल, तर ते शक्य नसे. त्यामुळे 'बँक ऑफ अमेरिका'नं त्यावर शक्कल लढवून, अनेक बँकांनी एकत्र येऊन आपली एक संघटना बनवून आपल्या ग्राहकांना क्रेडिट कार्ड देण्याचा पर्याय काढला. त्यामुळे एका बँकेनं दिलेलं क्रेडिट कार्ड समजा कुठल्या खातेदारा नं त्या एकत्र आलेल्या बँकांपैकी कुठल्याही बँकेत खातं असलेल्या दुकानदाराकडे वापरलं तरी चालेल, अशी ही योजना होती. बँक ऑफ अमेरिकेच्या जाळयानं संबंधित बँका जोडलेल्या असत. या क्रेडिट कार्डाला कॅलिफोर्नियात 'बँक अमेरिका कार्ड' या नावानं ओळखलं जाई. 1976 साली तिचं 'व्हिजा' असं नामकरण करण्यात आलं. काही बँकांना मात्र बँक ऑफ अमेरिकेच्या या योजनेत सहभागी व्हायचं नव्हतं. या बँकांनी एकत्र येऊन आपली 'इंटरबँक कार्ड असोशिएशन' नावाची स्वतंत्र संघटना तयार केली आणि या संघटनेचं एक वेगळं जाळं तयार केलं. कालांतरानं या संघटनेचं बारसं 'मास्टर कार्ड' असं करण्यात आलं.

— अतुल कहाते

**प्रश्न** :

(1) क्रेडिट कार्डाची सुरुवात कधी, कुठे आणि कोणी केली ? 2

(2) फ्रँकलिन नॅशनल बँकेने 1951 मध्ये काय केले ? 2

(3) 'मास्टर कार्ड' संघटना कशी तयार झाली ? 2

**किंवा**

वरील उतारा वाचून त्याचा सुमारे **शंभर** (100) शब्दांत सारांश लिहा.

9. (अ) **एक** वाक्यात उत्तरे लिहा :—

(1) लोकहितवादींनी सुधारणाविषयक 'शतपत्रे' कोणत्या साप्ताहिकातून लिहिली. 1

(2) 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथाचे लेखक कोण ? 1

(3) भारतीय लोकशाहीचे भवितव्य काय ? हे भाषण कोणाचे ? 1

(4) 'भाषा आणि लोक जीवन' हे भाषण डॉ. कुसुमावती देशपांडे यांनी कुठे केले ? 1



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(ब) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा :—

(1) राज्यातील सर्व मराठी, गुजराती, उर्दू शळांतील मुली एकत्रित होऊन मार्चिंग करीत करीत ______ जमत. 1

(i) शाळेत (ii) चौकात (iii) न्यायमंदिरात

(2) साने गुरुजींनी ______ शब्द आपल्या हृदयीच्या सर्व सद्भावना एकवटून दिला. 1

(i) आंतरराष्ट्रीय (ii) आंतरभारती (iii) धर्मभारती

(3) मी तर शतकांच्या स्वप्नांचा ______ आहे उगवत्या जीवनाचा भाष्यकार आहे. 1

(i) आविष्कार (ii) भाष्यकार (iii) साक्षीदार

(4) माझ्या आयु: क्रमरूप ______ प्रारंभी प्रारंभीचेच परंतु एक नवें खंड त्या दिवसांपासून सुरू झाले. 1

(i) दिवसाचे (ii) पुस्तकाचे (iii) संगीताचे

(क) योग्य जोड्या जुळवा :—

(1) ज्ञानदेव — (अ) स्मृतिचित्रे 1

(2) लक्ष्मीबाई टिळक — (ब) हिरिनाचं देनं घनं 1

(3) सुरेश भट — (क) अमृतानुभव 1

(4) बहिणाबाई चौधरी — (ड) रंग माझा वेगळा 1

(इ) समायत

(ड) वाक्य पूर्ण करून लिहा :—

(1) ................................. या दोन साधनांनी माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रान्ती घडवून आणली आहे. 1

(2) ................................. हे एक विसाव्या शतकातील अत्यंत प्रभावी असे साधन आहे. 1

(3) ................................. हा जगभरातील सर्वक्षेत्रातील माहितीचा मोठा संग्रह आहे. 1

(4) ................................. सर्वसामान्यांना लिहिते करून ते सर्वांपर्यंत नेण्याची संधी दिली. 1



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/